Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- XII | ISSUE- X | OCTOBER | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

# क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची भारतीय स्वतंत्रता आंदोलनात भूमिका

**डॉ. शरद सांबारे**
यशोदा गर्ल्स आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, नागपूर

**सारांश**

*आदिवासी समाजक्रांतीचे जनक अशी भगवान बिरसा मुंडा ख्याती असून यांनी देशाच्या स्वतंत्र करीत महत्वाची भूमिका होती, ख्रिश्चन धर्माचा त्याग केल्यानंतर बिरसाईट धर्माची स्थापना विषयक कारणे, सरदार चळवळीतून मिळालेली प्रेरणा, इंग्रजांविरुद्ध संघर्ष, 'उलगुलान' मुक्ती आंदोलन, व छोटा नागपूर टेनन्सी अॅक्ट मंजूर इत्यादींचा समावेश या लेखात करण्यात आला आहे.*

## परिचय

क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंडमधील उलिहातु या गावी झाला आणि सर्व कुटुंब उदरनिर्वाहासाठी बिरसांची आत्याच्या आयुभातु या गावी जाऊन राहू लागले. बिरसांनी बासरी, चित्र रेखाटणे, नकला, टुईला वाजविणे, नृत्य, आखाड्यात जाणे इत्यादी छंदात पारंगत होते.

## ख्रिश्चन धर्माचा त्याग करून बिरसाईट धर्माची स्थापना

जयपाल नाग हे आदिवासी समुदायाचे व्यक्ती यांच्या आश्रमात आयुभातुजवळ सलगा या गावात सुरुवातीला जात असत. इ. स. १८८६ मध्ये बिरसांचे थोरले बंधू कानु यांनी जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये बिरसाला शाळेच्या अटीनुसार ख्रिश्चन धर्म स्वीकारून याना दाखल करण्यात आले. बिरसांनी ख्रिश्चन धर्माचा त्याग केला याचे प्रमुख कारण म्हणजे इ.स. १८९० ला जर्मन लुथेरियन मिशनचे अध्यक्ष फादर नोट्रोट यांनी शाळेत केलेल्या भाषणात मुंडा आदिवासींना ठग, चोर, बेइमान असे शब्द वापरल्यामुळे बिरसा यांनी फादर नोट्रोटचा विरोध केल्या कारणास्तव बिरसांना शाळेतून काढण्यात आले. आनंद पांडे या वैष्णवपंथीयांकडून धार्मिक शिक्षण लग्नानंतर बिरसांनी बांदगावात वास्तव्याला असतानी घेऊ लागले व मुंडा जमातीच्या परंपरागत जीवनपद्धतीमध्ये, धर्मामध्ये परिवर्तन व सुधारणा करण्याकरिता हिंदू, ख्रिश्चन व मुंडा आदिवासी या धर्मातील चांगली तत्त्वे एकत्रित करून नवीन बिरसाईट (Birsaites) धर्माची स्थापना केली. लोकसंघटन व मुंडा जमातीत एकता निर्माण करून मुंडा आदिवासीना पोषक तत्वांची जनजागृती करू लागले.

## सरदार चळवळीच्या प्रेरणेतून क्रांतिकारक चळवळ

इ.स. १८५७ च्या क्रांतीनंतर, मुंडांचे प्रमुख 'सरदार' यांनी इंग्रजांनी हिरावून घेतलेल्या मुंडा आदिवासींच्या छोटा नागपूर येथील शेतजमिनी परत मिळविण्यासाठी संघर्ष सुरू असतांना आंदोलनात्मक लढाईचा बिरसांच्या मनावर प्रचंड प्रभाव पडला यामधून इंग्रजांच्या गुलामीतून आदिवासी समाजाला मुक्त करण्यासाठी मुंडा आदिवासींना एकत्र जाण्याकरिता क्रांतिकारक चळवळीला बिरसांनी सुरुवात केली. या व्यापक चळवळीला संपविण्याकरिता इंग्रजांनी गावागावांत जेवढ्या आदिवासींच्या जमिनी आहेत त्यांवर सरकारी वन-अधिकाऱ्यांचा अधिकार आहे, तसेच इंग्रजांनी अनेक ठेकेदारांना दारूचे परवाने वितरित केले. अश्या नियम-अटीमुळे, मुंडा लोकांचा जगण्याचा अधिकारापासून वंचित होऊन समाजाचे नुकसान होईल तसेच अशिक्षित मुंडा आदिवासी नेहमी दारूच्या नशेत राहतील आणि आंदोलनापासून अलिप्त राहतील याकरिता बिरसांनी या नियमांचा विरोध करून इंग्रजांविरुद्ध आवाज उठविला सोबतच आदिवासी बांधवांना शिक्षणाचे महत्व समजवून याची जागृती केली.

**इंग्रजांविरुद्ध संघर्ष**

सन १८९४ मध्ये पडलेल्या आदिवासी भागात दुष्काळात, इंग्रजांची आदिवासींना कोणत्याही प्रकारची मदत नव्हती तसेच जमीन महसूल ठराविक तारखेलाच भरण्याची सक्ती होती, यामुळे अनेक आदिवासींना आपल्या जमिनी सावकार व जमीनदार यांच्याकडे गहाण ठेवून मोठ्या प्रमाणात व्याजदर तारण जमिनी सोडवणे अशक्य झाले. आदिवासी भूमिहीन झाल्यामुळे बिरसांनी इंग्रजांविरुद्ध आदिवासी तरुण बांधवांचे संघटन निर्माण केले सोबतच जनजागृती करून आदिवासी समाजामध्ये नवचेतना निर्माण केली. दिनांक २६ ऑगस्ट १८९५ ला इंग्रज शासनाने बिरसांना व त्यांच्या सहकाऱ्यांना बंदी व अटक केली. यामुळे पुन्हा आदिवासी समाजात इंग्रजांविरुद्ध संघर्ष सुरु झाला व शेवटी ३० नोव्हेंबर १८९७ रोजी बिरसांची सुटका करण्यात अली.

**'उलगुलान' मुक्ती आंदोलन**

गावोगावी गुप्त बैठका घेऊन बिरसांनी मुंडा राज्य स्थापन करण्याकरिता सुमारे ५००० आदिवासी सामील करून सेवादलाची स्थापना झाली. बिरसांनी दिनांक २५ डिसेंबर १८९९ ला इंग्रज अधिकारी,जमीनदार, सावकार, इंग्रजधार्जिणे ठेकेदार व ख्रिश्चन धर्मप्रसारक यांच्याविरोधात कायद्याची लढाई सोडून आक्रमक व प्राणघातक हल्ले सुरु करत सिंगभूम, रांची, चक्रधरपूर, खुंटी, तामाड व कोरा या प्रदेशांतील पोलीसचौक्या जाळल्या गेल्या. या हल्ल्यात हजारो पोलीस व मुंडा आदिवासी मारले गेले. अखेर बिरसांना पकडण्यासाठी इंग्रजांकडून ५०० रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आल्यामुळे मनमारू व जवाईकेला या गावातील काही युवकांनी बिरसा जंगलात असल्याची बातमी इंग्रजांना दिल्यामुळे ३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसांना पकडण्यात आले. बिरसा रांची येथे कैदेत असताना यांचे निधन झाले. इ.स. १९०२ मध्ये ब्रिटिशांनी बिरसाच्या आंदोलनाची दाखल घेऊन 'छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट' मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले. आदिवासी-हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून क्रांतिसूर्य भगवान बिरसा परिचित आहे.

**निष्कर्ष**

भगवान बिरसा मुंडा याना आदिवासी समाजक्रांतीचे जनक समजल्या जात असून हजारो वर्षांपासून चालत आलेल्या पारंपरिक धर्माचं वर्चस्व, इंग्रजांच्या आशीर्वादाने स्वदेशी शेठ-सावकार, जमीनदार, व्यापारी यांच्या द्वारा होणारी पिळवणूक, ख्रिस्ती मिशनऱ्यांचं आक्रमक, धार्मिक धोरण आणि इंग्रजांनी लादलेली गुलामगिरी इत्यादींच्या विरोधात क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांनी आदिवासी समुद्यात जनजागृती करून आंदोलन सुरु केले. सरदार चळवळीतून प्रेरणा घेऊन यांनी देशाच्या स्वतंत्र चळवळीत मोलाचे योगदान दिले.

**संदर्भ**

१. कुवर, गोपीकृष्ण. (२०२०). बिरसा मुंडा. दिल्ली: ज्ञान गंगा प्रकाशन
२. तुमराम, विनायक. (२०१२). आदिवासी साहित्य : दिशा आणि दर्शन. औरंगाबाद : स्वरूप प्रकाशन
३. बिरसा मुंडा. Retrieved from https://marathivishwakosh.org/13718/
४. मेश्राम, भुजंग. (१९९५). उलगुलान. औरंगाबाद: साकेत प्रकाशन
५. येशनकर, रमेशचंद्र. (२०१२). उलगुलान बिरसा मुंडा का जीवन चरित्र. जयपूर: बीएसपिके पब्लिकेशन
६. समीर, एम. एस. (२०१९). भगवान बिरसा मुंडा. दिल्ली: मनोज प्रकाशन
७. सिंह, कुमार सुरेश. (२००३). बिरसा मुंडा और उनका आंदोलन. नई दिल्ली: वाणी प्रकाशन